

# कुमार पुष्पक

बलवन्त

REFBK-0011989
REFBK-0011989
१८६१
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५२४

# कुमार पुष्पक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 3०८.२२ विः ३/०५
क्रमांक ९४२८ नों दि: २७/८/६९

कवि बलवंत

REFBK-0011989
REFBK-0011989

११९८८

किंमत : रु. १·२५

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

: प्रकाशक :

दामोदर पांडुरंग रानडे,
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रकाशन,
५६२ सदाशिव पेठ, पुणें २.

☆

प्रथमावृत्ति : १९६१

☆

सर्व हक्क स्वाधीन
कवि बलवंत
[ नरहर दिनकर दुगल ]
शारदाश्रम, बोर्डी,
( जि. ठाणें )

☆

: मुद्रक :

दामोदर त्र्यंबक जोशी,
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
५६२ सदाशिव पेठ, पुणें २.

# पुष्पकांत बसण्यापूर्वी

लहानपणची आठवण अशी कीं, आजी भूपाळया, ओव्या, अभंग म्हणत असतांना मी तिच्याजवळ चिकटून असायचा. तिला साथ करतां करतां मधेंच स्वरचित ओळी गायचा मीं. आजीला आपल्या नातवाचं मोठं कौतुक वाटायचं नि कुणी आलं कीं, ती प्रदर्शनहि करायची त्याचं.

कुमार वयांत शाळेंतल्या दोस्तांना कविता रचून दाखविण्याची करामत अनेकदां करून दाखवीत असें मीं. त्या कालांतल्या केवळ दोनच कविता आज हयात आहेत. त्या वेळीं माझं कौतुक करणारे एक शिक्षक मला लाभले होते. त्यांनीं त्या कांचफलकांत लावून त्यांचं प्रदर्शन केलं होतं म्हणून त्या जगल्या.

पंचविशींत केलेल्या कविता खोल खोल दडून बसल्या आहेत. कधीं प्रकाशांत येतील तें त्यांचं त्यांना ठाऊक !

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या गेल्या तपांत जन्मलेल्या काव्यबालिका मात्र आपल्या चिमुकल्या जगांत निर्व्याजपणें कुमार-कुमारिकांना डोलवीत आहेत.

ह्या कवितांपैकीं बहुसंख्य गीतें आहेत. अलौकिक अशा आनंदाचा अनुभव घेत असतांनाच्या समाधि–अवस्थेंत स्फुरलेलीं अशीं कांहीं आहेत. विशिष्ट चाली मनांत घोळत असतांना स्फुरलेलीं अशीं कांहीं आहेत. जूनमध्यें शाळा सुरू झाल्यावर मुलांमुलींचे संघ पाडण्याचें काम सुरू झालें कीं, कांहीं दिवस एक विशिष्ट वातावरण बनत असतें आमच्याकडे. संघांना नांवें कोणतीं द्यावीं, नांवाला अनुरूप संघचिन्ह कोणतें ठरवावें, गीत कोणत्या चालीवर करावें, गीतांत रंगभूमीवर उठावदारपणें दृश्यें दाखवितां येतील असा आशय कसा आणावा असे विचार चालू होत, कल्पनाचित्रें डोळ्यापुढें तरळत आणि गीत तयार होई. कांहीं वेळां मुलांनींच नांव ठरवावें, संघचिन्हाची कल्पना करावी, स्वतःला आवडणारी चालहि मला द्यावी नि मग मीं गीत तयार करावें. संघगीतें अशीं जन्मलीं.

कांहीं गीतें प्रासंगिक आहेत. शाळेंतील समारंभ, थोर व्यक्तींचे शताब्दि-महोत्सव, स्वातंत्र्यसमर, शताब्दि-महोत्सव, महाराष्ट्र राज्य प्रतिष्ठापना महोत्सव अशा प्रसंगीं तयारीच्या कालांत विचार, कल्पना, भावना यांची दाटी होऊन काव्यरूपानें त्यांना वाट मिळाली. मित्रांनीं आग्रह करूनहि कांहीं गीतें तयार करवून घेतलीं.

हीं सर्व गीतें शाळेंतील मुलांमुलींनीं गोड गळ्यानें म्हटलीं, त्यांतील आशयानुरूप संघचिन्हें रंगभूमीवर साकार केलीं आणि प्रेक्षकांना रिझविलें. जीं गीतें विद्यार्थ्यांना आवडलीं तीं 'शालापत्रक,' 'आनंद,' 'चांदोबा' अशा मासिकांत प्रसिद्धीसाठीं दिलीं. त्यांतील कांहीं गीतांचा एक संग्रह काढावा असा अनेक चाहत्यांनीं आग्रह केला. प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ प्रा. कु. सुलभाबाई पाणंदीकर आणि शालापत्रकाचे सव्यसाची संपादक श्री. दामुअण्णा रानडे यांनीं मला सतत प्रोत्साहन दिलें. गीतसंग्रहाच्या कल्पनेला मूर्त स्वरूप येत आहे याचें श्रेय त्यांनाच आहे. प्रस्तावना लिहिण्याचें मान्य करून प्रा. कु. सुलभाबाईनीं मला अधिकच उपकृत केलें आहे. माझे स्नेही श्री. बापूसाहेब परांजपे आणि त्यांच्या पत्नी यांनीं मेहनत घेऊन आपुलकीनें माझ्या कांहीं गीतांना नोटेशन दिलें. आभार मानण्याचा औपचारिकपणा कसा करूं? मला सतत प्रोत्साहन देणारे पू. आचार्य काकासाहेब कालेलकर आणि पू. आचार्य भिसे यांचें ऋण एवढें मोठें आहे कीं, त्यांचा अनृणी होऊंच शकणार नाहीं मी. आतां महाराष्ट्रकवि यशवंत यांचे आभार कोणत्या शब्दांत मानूं? कवि म्हणून शारदेच्या मंदिरांत ज्याचा अजून प्रवेशहि झाला नाहीं अशा माझ्यासारख्या अनोळखी माणसाच्या गीतसंग्रहाला आशीर्वाद द्यायला यशवंतांनीं पुढें सरसावावें ही घटना त्यांच्या अभिजात थोरपणामुळेंच घडली.

कुमारवयाच्या मुलांमुलींना त्यांच्याचसाठीं तयार केलेलें हें पुष्पक थोड्यातरी भराऱ्या मारायला मदत करून त्यांच्या आनंदांत भर घालील अशी आशा करूं ना?

न. दि. दुगल

# प्रस्तावना

श्री. दुगल यांच्या काव्याचा परिचय, त्यांच्या एका विनोदी गीतावरून मला प्रथम झाला. १९५६ च्या मे महिन्यांत, माध्यमिक शाळांतील शिक्षक व मुख्याध्यापक यांचा एक 'कॅंप् कम् सेमिनार' बोर्डी येथें भरला होता. वीस-पंचवीस शाळांतून आलेल्या शिक्षकांचा परस्परांशीं परिचय व्हावा ह्या हेतूनें सेमिनारच्या संचालकांनीं कांहीं गंमतीच्या खेळांची योजना केली होती. एक खेळ होता आपापले जोडीदार शोधण्याचा. 'राम' 'सीता' 'रोमिओ' 'जुलिएट्' 'लैला' 'मज्नू' असें एकेक नांव असलेल्या चिठ्या सर्वांना वांटण्यांत आल्या होत्या आणि प्रत्येकानें आपल्याला मिळालेल्या नांवावरून आपला जोडीदार शोधावयाचा होता आणि जोडीदाराशीं दहा मिनिटें बोलून त्याची माहिती सर्वांना द्यावयाची होती. चिठ्यांच्या वांटपांत स्त्रियांच्या नांवाच्या चिठ्या पुरुषांकडे व पुरुषांच्या नांवाच्या चिठ्या स्त्रियांकडे असा गोंधळ बुद्ध्याच घडवून आणला होता. त्यामुळें खेळाला चांगलाच रंग भरला आणि त्यावरून श्री. दुगल ह्यांच्या मनांत एक गीत स्फुरलें. त्या गीतांत सेमिनारचे सदस्य 'सेमि नर नारी' कसे बनतात ह्यावर विनोद होता व प्रत्येक कडव्याच्या शेवटीं 'सेमिनार कम्' हे शब्द असलेलें ध्रुपद येई. तेथें जमलेल्या मंडळीस हें गीत फार आवडलें आणि लहान-थोर सर्वांनीं संघगीत वा संचलनगीत म्हणून त्याचा उपयोग केला.

'कुमार-पुष्पक' या संग्रहांतील कविता व गीतें वेगळ्या धर्तीवर आहेत. माझ्या मतें त्या सर्वांचें वैशिष्ट्य हें कीं त्यावरून उत्साही व रसिक वृत्तीचा शिक्षक शालेय वातावरणांत रंगून जातो आणि त्या तन्मयतेंतून त्याच्या मनांत काव्य स्फुरतें याची प्रतीति येते. शिक्षकाच्या जीवनांत किचकट, त्रासदायक व कंटाळवाण्या अशा गोष्टी असल्या तरी रसिक मनाला त्याच जीवनांत अनेक स्फूर्तिस्थानेंहि सांपडतात. बालजीवनाशीं समरस होऊन,

शारदामंदिराच्या उदात्त वातावरणाशीं एकरूप बनून व थोर व्यक्तींच्या मोठेपणांत विलीन होऊन श्री. दुगल यांचें काव्य उत्स्फूर्त झालें आहे. बऱ्याचशा कविता प्रासंगिक असल्या तरी त्यांचें स्वरूप हुकुमी नाहीं. कवीनेंच साक्ष दिली आहे कीं, " विचार, कल्पना, भावना यांची दाटी मनांत होऊन काव्यरूपानें त्यांना वाट मिळाली. "

'ललकार', 'शांति-क्रांति', 'खेळाडूंचें गीत', 'क्रीडामहोत्सव' हीं गीतें शब्द–अर्थ–चाल सर्वच दृष्टींनीं स्फूर्तिदायक आहेत. संचलनाचे वेळीं वा क्रीडामहोत्सवाचे प्रसंगीं संघगीतें म्हणून सामुदायिक रीत्या म्हणण्यास तीं योग्य आहेत. तीं गातांना त्यांच्या आकर्षक चालीनें त्याचप्रमाणें त्यांच्या अर्थानें विद्यार्थ्यांना स्फुरण चढेल. त्यांतला संदेश बहुमोलाचा आहे आणि बालमनावर ठसेल अशा शब्दांत तो सांगितला आहे.

'गरुडापरि' व 'श्री महाराष्ट्र आमुचा नव्या नवलाचा' या दोन्ही कवितांतून 'दिव्यभव्य उत्तुंग' अशा ध्येयानें प्रेरित झालेल्या कविमनाचें दर्शन होतें; आणि 'खुजीं दैवतें' सोडून देऊन वाचकाच्या मनाची झेंप 'निळया अंबरीं' पोंचते.

थोर व्यक्तींवरच्या कविता विशेष प्रभावी वाटतात. नेताजी, गुरुजी व सुनीतांजलीमधले आधुनिक सांदीपनी ह्यांच्या थोर व्यक्तित्वानें आणि त्यागमय व सेवामय जीवनानें कवीची प्रतिभा जागृत झाली आहे आणि जें काव्य निर्माण झालें आहे त्यांत चैतन्य आहे.

हें कुमार-पुष्पक कुमारांना स्फूर्ति देऊन भावनांच्या अंतराळांत भरारी मारण्यास प्रवृत्त करील असा विश्वास आहे.

खार, मुंबई ५२.
२८-१-१९६१

सुलभा पाणंदीकर

# अर्पण-पत्रिका

कै. ती. ताईस—

प्रेम, करुणा, त्याग आणि सहनशीलपणा यांची मूर्ति होतीस तूं ताई. तूं केवळ आपल्या मुलांवरच नव्हे तर सभोंवतींच्या सर्वांवरच निरपेक्ष प्रेमाचा वर्षाव केलास सतत. तूं आणखी जगतीस तर तुझ्या मुलांना सोसावे लागलेले परिस्थितीचे चटके सुसह्य झाले असते. एकवीस वर्षें झालीं तुला जाऊन तरी तुझे ते कारुण्यानं नि प्रेमानं ओथंबलेले भावपूर्ण डोळे सतत माझ्या नजरेसमोर दिसतात. तुझा बाळू तुझ्या पुण्यस्मृतीला आपलें हें "कुमार पुष्पक" प्रेमानें अर्पण करीत आहे.

—कवि बलवंत

# अ नु क्र म णि का


| | | | |
|---|---|---|---|
| १. तेनसिंग | १ | २१. खेळाडूंचें गीत | २१ |
| २. ध्रुव | २ | २२. विद्यार्थि–प्रतिज्ञा–गीत | २३ |
| ३. हुतात्म्यांना वंदन | ३ | २३. मातृभूमि मम प्यार | २४ |
| ४. प्रल्हाद | ४ | २४. माझी शाळा | २५ |
| ५. भगीरथ | ५ | २५. क्रीडामहोत्सव | २७ |
| ६. कर्मवीर | ६ | २६. गुरुजींनीं केलेली मृत्यूची आळवणी | २८ |
| ७. खेडुतांचें गीत | ७ | २७. भूदान–संक्रमण | ३० |
| ८. नवयुग | ८ | २८. बालदिन–गीत | ३१ |
| ९. सिद्धार्थ | ९ | २९. लोकमान्यांना वंदन | ३२ |
| १०. ललकार | १० | ३०. वीरांस देउंया मान | ३३ |
| ११. पार्थ | ११ | ३१. सुनीतांजलि | ३४ |
| १२. शांति – क्रांति | १२ | ३२. गानसमाधी | ३५ |
| १३. नीलकंठ | १३ | ३३. सुवर्णकालीं | ३६ |
| १४. नेताजी | १४ | ३४. गरुडापरि | ३८ |
| १५. तेजस्विनी | १५ | ३५. योजनगंध गांधीजी | ३९ |
| १६. भूमिकन्या | १६ | ३६. श्रीमहाराष्ट्र अमुचा नव्या नवलाचा | ४१ |
| १७. पद्मजा | १७ | ३७. माझें जीवनस्वप्न | ४३ |
| १८. ज्योत | १८ | स्वररचना | ४५ ते ५६ |
| १९. अर्चना | १९ | | |
| २०. मंदारमाला | २० | | |

# दोन अभिप्राय

" बलवंतांच्या कांहीं कविता मी वाचल्या, थोड्या त्यांच्या तोंडून ऐकल्या. मला यांत काव्यात्मा सांपडला. आजच्या स्वातंत्र्ययुगांत भारतीय भाषांचा घरोबा वाढला पाहिजे. म्हणूनच म्हणतों कीं, बलवंतांसारख्या खऱ्याखुऱ्या कवींनीं हिंदी, गुजराती आणि बंगाली इतक्या जवळच्या क्षेत्रांतील जुन्या नव्या कवींशीं व त्यांच्या साहित्याशीं उत्कट परिचय वाढविला पाहिजे. या भाषा मराठीला जवळ आहेत. तेव्हा आदानप्रदान करणें सोपें आहे. बलवंतांनीं आतां आंतरप्रांतीय झालेंच पाहिजे. "

—काका कालेलकर

" प्रसन्न चित्तानें गायिलेलीं हीं गाणीं कोवळ्या वयांतील बालवाचकांस पौष्टिक खुराकासारखीं होतील. ध्येयदृष्टि, सत्संकल्प, प्रतिज्ञा व त्यांच्यासाठीं करावी लागणारी तपश्चर्या, वगैरे चांगल्या गुणधर्मांचें बीज बालमनांत रुजायला ह्या गीतांचा उत्कृष्ट उपयोग होईल. गरुडापरि, माझी शाळा, गुरुजींनीं केलेली मृत्यूची आळवणी, माझें जीवनस्वप्न, ह्या कविता मुलांचीं मनें सद्भावनांनीं पल्लवित करणारीं आहेत. तालांवरील संचलन व सांघिय गायन स्फूर्तिदायक असतें. या गुणांनीं युक्त असलेल्या ह्या गीतांचें स्वर-लेखन संग्रहाला जोडलेलें असल्यामुळें ह्याची उपयुक्तता अधिकच वाढली आहे. सटर-फटर, पोंचट, अभिरुचिविहीन, असलीं गाणीं मुलांच्या तोंडीं बसण्यापेक्षां, बालमनाला उत्साहदायक व उद्बोधक गीतें त्यांच्या मुखीं-मानसीं घोळावींत, ही कवीची आकांक्षा अभिनंदनीय आहे. अध्यापनाच्या व्यवसायांत ते समरस झाले आहेत ह्याची साक्षच हीं गाणीं देत आहेत. ज्या क्षेत्रांत आपला संचार आहे त्या क्षेत्राला उपकारक होणें, आपण बालमनोवल्लरींचे मालाकार आहोंत ही जाणीव असणें व त्या बालमनो-वल्लरींच्या संवर्धनासाठीं झटणें ही त्यांच्या ह्या छंदामागची प्रेरणा असल्यामुळें त्यांचा हा गीतविलास त्यांना भूषणावह आहे. "

—यशवन्त दि. पेण्ढरकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३०९२३ वि: ......
क्रमांक ९५२४ २१।५।७

# १. तेनसिंग

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ११०८५

शृंग जिंकिलें आम्हीं
एव्हरेस्ट बापुडें
तेनसिंग संगतीं
आम्ही चाललों पुढें ॥ ध्रु० ॥

द्वंद्व आज संपलें
निसर्ग-देव नमविले
असाध्य तेंहि साधिलें
दुर्लंध्य लंघिले कडे ॥ १ ॥

तेनसिंग ह्या क्षणीं
मनुजलक्ष वेधुनी
जाहला वीराग्रणी
जगत सर्व तोकडें ॥ २ ॥

नम्रवृत्ति राखुनी
उच्च ध्येय ठेवुनी
जाणिवेसि घेउनी
सतत राहुंया खडे ॥ ३ ॥

☆ ☆ ☆

## २. ध्रुव ( नाट्यगीत )

( अरण्यांतील रानटी श्वापदें ध्रुवास सांगतात. )

थांब ! हो चालता ! परत जा, परत जा !
क्षुद्रजीवा, ध्रुवा ! गर्व वायां ।
ह्या घनघोर वनीं असति किती आपदा
परत जा ! हट्ट कां धरिशि वायां ?
थांब हो चालता ............ ॥ १ ॥

( ध्रुव त्यांना बजावतो— चाल बदलून )

जा, खुशाल गर्जा, तुम्ही प्रबळ
परतणार ना, मीं ध्रुव अढळ !
निश्चय मनीं मीं एकचि केला
परमेशाचा धांवा मजला
अन्य मार्ग का ध्रुवबाळाला
वर देइल विष्णू सढळ
परतणार ना, मी ध्रुव अढळ ॥ २ ॥

( श्री विष्णु प्रसन्न झाले— चाल बदलून )

सदय कृपानिधि विष्णू आले
सुखवित ध्रुवबाळास
झाली सार्थ ही जीवनआस ।
'काय तुला रे देवूं, बाळा ?'
'केवळ एकचि अढळ पदाला'
'ध्रुवतारा तेजस्वी होवो नित्य तुझाचि निवास !'
झाली सार्थ ही जीवनआस ॥ ३ ॥

( पहिल्या भागांत श्री. वि. द. घाटे यांचे ऋणाबद्दल आभार )

☆ ☆ ☆

# ३. हुतात्म्यांना वंदन

देउनी पूर्ण आहुती । हुतात्मा धन्य हो जगतीं
असे त्या एकची ध्यास । मातृभू मुक्त करूं हाच
गळ्याला फांस असतांही । आईला हंसत दे ग्वाही
जगाला दाखवी शौर्य । हिंदवी आगळें वीर्य
हिंदभू धन्य तूं असशी । हुतात्म्यां स्फूर्ति गे देशीं
तुझे नरवीर संतान । तुझ्यास्तव अर्पिती प्राण
ज्ञात तैसेहि अज्ञात । मृत्युवरी करिती ते मात
धन्य ते, धन्य तूं माता । पाहुनी हर्षला धाता
नमूंया झांशिची राणी । पाजिलें इंग्रजां पाणी
क्रांतिच्या संगरीं वीर । वासुदेव फडके रणधीर
गर्जती केसरी टिळक । क्रांतिचे आग्रही जनक
अंदमानिं झिजले ते वीर । मुळशिला सेनापति थोर
भगतसिंग गेनुजी गाजी । आझादहिंद सैन्य रणगाजी
सत्तावनीं बेचाळीस सालीं । गाजले वीर बलशाली
हुतात्मा मंत्र जयहिंद । नेताजी धन्य अमरेन्द्र
गांधीजी भव्य तेजस्वी । आहुती भारता दिपवी
एकीचा दिव्य संदेश । अहिंसा सत्य उपदेश
सेवुनी सुखवूं भारत । आहुती करूं या सुफलीत

☆ ☆ ☆

# ४. प्रल्हाद

गर्जवा ! भारतीं, प्रल्हादाची ध्येयनिष्ठा
बालकाची कार्यनिष्ठा, देव त्याला साह्यकर्ता ॥ ध्रु० ॥

लोटला प्रल्हाद खालीं
अमृताची धार भालीं
पार झाल्या राक्षसांच्या वल्गना साऱ्याच नष्टा ॥ १ ॥

टाकितां ह्या तप्त कढई
हा हसे, हरीनाम घेई
क्रुद्ध झाला हिरण्यकशिपु करकरा चावीहि दंष्ट्रा ॥ २ ॥

लाथ मारी स्तंभ भंगे
प्रगटला नरसिंह अंगें
नष्ट झाल्या पापराशी, भक्त झाले हृष्ट चित्तीं ॥ ३ ॥

( पहिल्या दोन कडव्यांतील दृश्यें सावल्यांच्या साहाय्यानें व शेवटच्या कडव्यांतील दृश्य प्रत्यक्ष रंगभूमीवर दाखवितां येईल. )

☆ ☆ ☆

# ५. भगीरथ

भगिरथा, भगिरथा ! धन्य धन्य तूं किती
जाहलास सत्कृती
भारतांत जनगणांस आदर्श संप्रती
जय शंभु महादेव ॥ ध्रु० ॥

प्रार्थुनी तयास हृदयमंदिरांत आणिलें
ना कधींहि त्यागिलें सतत कार्य आपुलें
धन्य वीर्य तें ।
श्रद्धेवर श्रमणारा, आशेवर तगणारा
श्रान्त ना कधीं, भ्रान्त ना कधीं
आजही म्हणुनि तो आदर्श भारतीं
जाहलाचि सत्कृती ॥ १ ॥

तोषुनी ही जान्हवी धांव घेई भूवरी
आणि करित चालली सुवर्णभूमि ही खरी
स्तुत्य कर्म तें ।
भूमीवर जगणारा चंद्रसूर्य स्तवणारा
ज्ञान वाढवी, काव्य गाजवी
या जगीं हिंदी तो शांतिदूत मानिती
आदर्श संप्रती ॥ २ ॥

☆ ☆ ☆

# ६. कर्मवीर

कर्मवीर! श्रमतां, जगतीं क्रांतीला आणितां
लोकमान्य ते स्वातंत्र्याच्या घोषानें खुलती
महात्मा गांधी चरखा फिरवुनि सत्याग्रह करिती ॥ ध्रु० ॥

तुटल्या गुलामगिरीच्या बेड्या
गळल्या परावलंबी खोड्या
उठ रे स्फूर्तीनें तूं वेड्या
बिंदुबिंदुंतुन नसानसांतुन रक्त नवें उसळतां
जगतीं क्रांतीला आणितां ॥ १ ॥

शिकला अज्ञानांतिल सर्जा
बनला खेडुत खराच राजा
चल रे लागूं अपुल्या काजा
रजारजांतुन कणाकणांतुन पीक नवें काढितां
जगतीं क्रांतीला आणितां ॥ २ ॥

दिधला नव्या युगाचा मंत्र
सृजिलें भूमिदान हें तंत्र
तकली सूत्रबद्ध तें यंत्र
विनोबाजींनीं मानवतेला असेंच उद्धारितां
जगतीं क्रांतीला आणितां ॥ ३ ॥

☆ ☆ ☆

# ७. खेडुतांचें गीत

या रे तुम्ही, उठा रे, खेडूत एक व्हा रे राष्ट्रास
उद्धरा रे ॥ ध्रु० ॥

आराम हा हराम । कर्तव्य एक काम
पिकवून अन्न सारें । राष्ट्रास उद्धरा रे ॥ १ ॥

कृषिकर्म हाचि धर्म । नच काढुं अन्य वर्म
ऋषिध्येयनिष्ठ बा रे । राष्ट्रास उद्धरा रे ॥ २ ॥

हातांनीं या विणूं रे । वस्त्रांसि आपुल्या रे
कांतून सूत द्या रे । राष्ट्रास उद्धरा रे ॥ ३ ॥

स्त्रीपुत्रकादि सारे । ज्ञानासि मेळवा रे
करूं सार्थनाम भू रे । राष्ट्रास उद्धरा रे ॥ ४ ॥

☆ ☆ ☆

## ८. नवयुग

ऐका ऐका तुम्हां सांगतों महती हिंदुस्थानाची।
ह्या भूमीनें नवयुग सृजिलें आहुति अर्पुनि प्राणांची ॥
वंदे मातरम्। वंदे मातरम्। वंदे मातरम्। वंदे मातरम्॥ ध्रु०॥

टिळकयुगानें केली जनता जागृत निर्भय शाहणी।
गांधीजींची सत्यअहिंसा करवी अद्‌भुत ती करणी ॥

जवाहरानें दिला जगाला शांतीचा संदेश रणीं।
भूदानानें क्रांति करूंया ऋषी विनोबांची वाणी ॥

झाली आतां नव्या युगाची नांदी कामकरी राज्याची
ऐका ऐका तुम्हां सांगतों महती हिंदुस्थानाची ॥

☆ ☆ ☆

# ९. सिद्धार्थ

( चाल—भूपाळी )

प्रेममया सिद्धार्थ ! उद्धरा दुःखी अवनीतला
नत झाली ही हिंदी जनना, आर्त हांक ही तुला॥ ध्रु० ॥

राजपुत्र सिद्धार्थ पाहतो दैन्य मरण दुःखें
त्यागी राज्य धन पुत्रपत्नी प्रिय सारीं तीं सौख्यें
राजगृहा सोडूनि निघाला घालुनि यतिवस्त्रें
बोधगयेसी व्रत आचरितो शांति मना लाभे
तुटति तटातट बंध भवाचे, दिव्य शक्ति संचरे
सत्यअहिंसा प्रेमधर्मरत बुद्ध जगीं अवतरे
करुणामुदिता दीनोद्धरणीं शक्त मंत्र जाहले
बुद्धं शरणं गच्छामि हे संघघोष नादले॥

☆ ☆ ☆

## १०. ललकार

झनक झनक ताल द्या
मानवता हा मंत्र गा
जग हें सारें आपुलें
चल जगांत सारे नांदुंया ॥ ध्रु० ॥

भारतपुत्र शांतिदूत
वसुधा कुटुंब मानिती सुख
गगन भेदुनी सारे गा
ललकार हा, ललकार हा ॥ १ ॥

शेतकरी अन् कामकरी
जगास साऱ्या उद्धरी
सुखांत त्याला ठेवूंया
ललकार हा, ललकार हा ॥ २ ॥

श्यामपीतश्वेत रक्त
बंधु सर्व ईशभक्त
पूर्वपश्चिम दक्षिणोत्तर
ललकार हा, ललकार हा ॥ ३ ॥

☆ ☆ ☆

# ११. पार्थ

( चाल—बहु असोत )

जगीं असंख्य नरशार्दुल गाजती अहा
प्रिय सकलां कृष्णसखा पार्थ वीर हा ॥ ध्रु० ॥

भरतपुत्र भारतभू करिति मंगला
पांडव हरिभक्त वंश बहुत शोभला
धर्मभीमनकुलसहदेव द्रौपदी
कोंदण किति दिव्य पहा अर्जुनासही
पुत्ररत्न अभिमन्यू शोभला जया ॥ १ ॥

कुरुक्षेत्रीं गुरुजन ते वी पातले
बंधुसखे पुत्रपौत्र समरिं ठाकले
बघुनि तयां पार्थ मनीं व्यथित जाहला
त्यजुनि शस्त्र संमोहित चरणिं लागला
भगवंतें उपदेशिलि गीतसंपदा ॥ २ ॥

मामनुस्मर युध्यच हीच घोषणा
कर्मण्येवाधिकार हीच साधना
संशय अतितर्कदुष्ट दूर जाहले
विश्वरूपदर्शन अतिभव्य घेतलें
पौरुषासि पार्थ अतां करिल दुःसहा ॥ ३ ॥

☆ ☆ ☆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

## १२. शांति–क्रांति (संचलन गीत)

शांतिक्रांतिचा मंत्रघोष उठला
भरुनी अवनी, गगनीं घुमला ॥ ध्रु० ॥

चल पद पुढें टाक
एकतेची देत हांक
भीति सारी दूर फेक
धीर देत सकलां........ ॥ १ ॥

हिंदभूचें नांव झालें
शांतियोगें जग डोले
एकतेनें जीवन चाले
प्राणिमात्र धाला ....... ॥ २ ॥

तत्त्व भारतीय मोठें
प्रेमगंगा पूर लोटे
नष्ट होई सारें खोटें
देवहि संतोषला........ ॥ ३ ॥

चढ चढ हिमालय
गौरीशंकराचें प्रेय
सत्यधर्म हेंच ध्येय
स्वर्ग गांठूं चला........ ॥ ४ ॥

☆ ☆ ☆

# १३. नीलकंठ

जय जय नीलकंठ जय नीलकंठ देवा
धांव भक्तांच्या काजा ॥ ध्रु० ॥

कोटि कोटि त्या सुरासुरांनीं सागरमंथन चालविलें
आस एक कीं मिळवूं अमृत परंतु विष तें मेळविलें
कढों लागलें सिंधूचें जल विषमिश्रित तें भयंकर
जलचर मरती असंख्य त्यांची गणती कैशी खरोखर
येई गिरिजेच्या राया ॥ १ ॥

कालकूट ते सागरजीवनीं भरूनि उरलें जगतांत
जाळण्यास जग सज्ज जाहलें क्षोभुनि उसळे गगनांत ।
क्षणांत सारें विश्व करिल हें भस्म भविष्या जाणोनी
सांब सदाशिव कैलासाहुनि आला नमिला सर्वांनीं ।
जय महादेव गर्जा ॥ २ ॥

प्रलयंकर तें महाभयानक विष तें काळें निळें जरी
तांडव-नर्तन करुनि नमाविलें घोट घेतले परोपरी ।
कंठ जाहला निळा तत्क्षणीं नीलकंठ अभिधान खुले
निरुपममहिमा हर विश्वात्मा विश्वाला संतोष मिळे
जय शंभो शिव राजा ॥ ३ ॥

☆ ☆ ☆

# १४. नेताजी

नेताजी करि शांत चंडिका प्राण पदीं अर्पुनी
हिंदवी गडी यशाचा धनी ॥ ध्रु० ॥

भारतभूच्या पुण्याईनें वंग देश फुलला
जन्म दे सुभाषचंद्राला ।
महाराष्ट्रानें पंजाबानें पराक्रमा दीधलें
गुर्जरें मार्दव अर्पियलें ।
गुण-सुमनें जमलीं सारीं । बाळाला माला घाली ।
बुद्धीचें तेज तयाचें । पाहोनी जनता दिपली ।
मातेसि अर्पिलें सारें । त्यागानें विस्मित झाली ।
गांधीजींचा शिष्योत्तम हा अजोड विक्रांत
घालितो उडी संकटांत ॥ १ ॥

बलाढ्य इंग्रजकोंडी फोडुनी वडवानलिं शिरला
स्थापिलें आझाद सेनेला ।
युरोपांत संधान बांधुनी आशियांत आले
हुकुमते आझाद स्थापियलें ।
स्वातंत्र्य शहिद शोनान । बँकॉक हिंदवी झाली
हिंदवी शूर सेनेची । ' जयहिंद ' घोषणा घुमली ।
झाशीची राणी लक्ष्मी । स्त्रीपथकें लढण्या आली ।
' चलो दिल्ली ' हा पुकार उठला धडकी शत्रू उरीं
तिरंगी निशाण किल्ल्यावरी ॥ २ ॥

☆ ☆ ☆

# १५. तेजस्विनी

जय लक्ष्मी वदा, जयलक्ष्मी वदा
आम्ही तेजस्विनी लढणार
गगनभेदी ह्या रणघोषानें झाली क्रान्ति महान्
झाली क्रान्ति महान् ॥ ध्रु० ॥

'मेरी झांसी नहीं दूंगी, तुम छोडो हिंदुस्थान'
वदे, शूर रणचंडी अमुची हीच राणी ठरणार
मातृभूमि ही प्रिय सकलांची सदाच हो असणार
आम्ही तेजस्विनी लढणार ॥ १ ॥

भारतभूमी असे आमुची, तुम्ही लुटारू भार
तुम्हां न देऊं अतां आणखी क्षणभरही आधार
अतां न मानूं इथें पराचा कसलाहि अधिकार
आम्ही तेजस्विनी लढणार ॥ २ ॥

क्रांतियुद्ध तें सत्तावनचें आम्हांस स्फूर्तिस्थान
हिंदि स्त्रियांनीं तदा घेतलें तेज, व्रत, अभिमान
अतां न राहूं मागें कधींहि, पुढें पुढें घुसणार
आम्ही तेजस्विनी लढणार ॥ ३ ॥

☆ ☆ ☆

## १६. भूमिकन्या

( चाल–दौलतीच्या राजा )

भूमिकन्या आम्ही, समुद्या मिळूनी
साद घालुं सीतामाईला
बिगि बिगि चला ॥ ध्रु० ॥

जनकाचें तप आलें फळाला
शेत नांगरतां लागली हाताला
खपुनी तशाच मिळवूं लक्ष्मीला
देऊं जगा लवाकुशाला ॥ १ ॥

झालीया आपुली सव्तंत्र माता
उभी कराया देऊंया हाता
मुखीं तिच्या घाळूंया सुग्रास घासा
पाहूं तिच्या गोड गोड रूपाला ॥ २ ॥

घेतलिया आम्हीं शपथ अवंदा
बसवुनी टाकूं दारूचा धंदा
घरधनी राही ना कोणाचा मिंधा
पिकवूला सोनियाचा मळा ॥ ३ ॥

☆ ☆ ☆

# १७. पद्मजा

( चाल— विणेची छेड शारदे तार... )

जगाची तुला पद्मजे आण,
सुखाची अम्हां होइ तूं खाण ॥ ध्रु० ॥

वासुकिची ही करुनी दोरी
रवी बनविला मंदरगीरी
उदधि सुरासुर करिती मंथन । रत्नावलि ही छान ॥ १ ॥

कौस्तुभमणि खुलवी विष्णूसी
पारिजातकुसुमें कृष्णासी
धन्वंतीर चंद्रमा धेनु गज । रक्षिति मानव सान ॥ २ ॥

रंभा देवांगना भुलविती
अमृतमोहिनी घेइ आहुती
सुरा हलाहल हाय भिवविती । तारणार तूं जाण ॥ ३ ॥

☆☆☆

## १८. ज्योति

आर्त हांक दीन किती मारिती दिगंतरीं
क्रीमियांत पडले हे लढुनिया रणावरी ॥ ध्रु० ॥

शौर्य धैर्य हीं सरलीं
प्राणाशा नच उरली
वैरभाव बुडवी जन भयदतिमिरभीतरीं ॥ १ ॥

( चाल–बदलून )

तम भंगुनि आली आली दिव्य ज्योती मार्ग उजळी ॥ ध्रु० ॥

कमलकुसुमांचा मधु परिमल
उधळित फिरते माता प्रेमळ
दिव्य स्वर्गांची जणुं अवतरली
सुखवी अमृत घालुनि ओष्ठीं
सेवाव्रतरत झणीं झाली ॥ २ ॥

धन्य जहाली फ्लॉरेन्स जगतीं
रुग्णसेवनीं जीवन अर्पी
ज्योतिष्मती ही नाइटिंगेल
सारें जीवन ती उजळील
अबला स्त्री सबला झाली ॥ ३ ॥

☆ ☆ ☆

# १९. अर्चना

( चाल— प्राचीच्या मंदिरीं उषा ये अरुण–स्वागताला )

ईशाची अर्चना करूंया सुमन अर्पुनीया ।
परमकृपाळू दयानिधी तो स्तवनें आळवुंया ।। ध्रु० ।।

घाम गाळुनी सडा शिंपुया सृष्टीच्या अंगणीं
नवल पाहुं या ईशकृपेचें थेंबाथेंबांतुनी ।
घ्या हातीं घ्या कुदळ पावडें निनादवूंया धरा
निनाद ऐकुन अंकुर येतिल धान्याचे सरसरा ।। १ ।।

विळा घेउनी पिकें कापुंया सोन्याच्या राशी
वाटुनि घेऊं सगळे मिळुनी नांदू बांधवांशीं ।
अनंत हस्तें कमलवरानें देतां किती घेशिल
क्षुद्र मानवा दोन करांनीं ? कधि रे नत होशिल ? ।। २ ।।

☆ ☆ ☆

# २०. मंदारमाला

मंदारमाला सुर-वरमाला । अर्पि रुक्मिणी श्रीकृष्णाला ।। ध्रु० ।।

सागर मंथुनि सुरासुरांनीं । धरा नटविली नवरत्नांनीं
प्राजक्तांच्या दिव्य फुलांनीं । वसुधेवरती स्वर्ग वसविला ।। १ ।।

स्वर्गस्वरांनीं वाजवि मुरली । गोपाळांना रमवि गोकुळीं
द्रौपदीची मग लाज राखिली । अनंत अघटित दावुनि लीला ।। २ ।।

पांडव हरिचे सखे जाहले । म्हणुनि महाभारत तें घडलें
व्यास मुनींनीं काव्य रचियलें । धन्य कराया भगवंताला ।। ३ ।।

सोन्याची द्वारका वसविली । सुखसमृद्धी जगिं ओतियली
सुदामदेवा मैत्रि दाविली । विश्वरूप पुरुषोत्तम बनला ।। ४ ।।

☆ ☆ ☆

दा. क्र. ११९८९

# २१. खेळाडूंचें गीत

हे देवा जगतीं असो मज खुलें मैदान सर्वांसवें
संधीही सकलां समान असुं दे हेंची असे मागणें।

खेळाची अभिजात आवड असो चित्तीं खरी हिंमत
शार्दूलासम कौतुकास्पद असो माझें सदा क्रीडित ॥ १ ॥

जरी संगरीं श्रेष्ठ नैपुण्य माझें
जरी वागणें उच्च शीलासि साजे।

तरी घालुं दे माळ अंतीं यशश्री
मला मानुं दे दागिना ती धरित्री ॥ २ ॥

असेल हरणें तरी मन कधीं न माझें मळो
विषाद कटुता सरो दुरभिमान सारा जळो।

पराभवहि सोसुनी न मुखिचें हंसू मावळो
जयोऽस्तु म्हणुनी नमो विजयि वीर तो आकळो ॥ ३ ॥

नव्हे रे नाहिं हें माझें, यशाचें श्रेय हें तूझें
जगाचा स्वामि तूं असशी, खऱ्याला श्रेय तें देशी।

अम्हांला एकची धर्म, करावें सतत सत्कर्म
झटूंया नियम पाळाया, यशाचा तो असो पाया ॥ ४ ॥

( Olympic Song च्या आधारें )

(एकाच चालींत व थोडक्या शब्दांत)

असावें मोकळें मैदान, समस्तां संधिही समान
जडावें प्रेम खेळांचें, वागणें शूर वीरांचें ।

अम्हांला ईश्वरा देई, शक्ति अन् शील फलदायी
विषादा कधिंही ना मानूं, पराभव हंसुनिया झेलूं ।

नव्हे रे, नाहिं हें माझें, यशाचें श्रेय हें तूझें
जगाचा स्वामि तूं असशी, खऱ्याला श्रेय तें देशी ।

अम्हांला एकची धर्म, करावें सतत सत्कर्म
झटूंया नियम पाळाया, यशाचा तो असो पाया ।।

☆☆☆

## २२. विद्यार्थी–प्रतिज्ञा गीत

विद्यार्थी आम्ही घेऊं विद्या हो ऽ ऽ
कधिं ना गुरुला अवगणणार, नाहीं गुरुजींना त्यजिणार
शिस्त पाळणें याहुनि आम्हां
धर्म दुजा नाहीं असणार, कार्य दुजें नाहीं उरणार
विद्यार्थी आम्ही घेऊं विद्या हो ऽ ऽ।

चालुंया सततही ज्ञानमार्गीं
होउंया एकलव्य आणि गार्गी
शांति पुष्टि तुष्टी मिळवूं
जगतीं मानवता संपादूं
शर्थ करोनी सुखवूं हो जननी
दुंदुभि येतिल त्या श्रवणीं
ऐक मानवा ही ललकारी

जय हो विद्या यशसुखकारी, जय हो विद्यालय उपकारी
विद्यार्थी आम्हीं घेऊं विद्या हो ऽ ऽ ॥

☆ ☆ ☆

## २३. मातृभूमि मम प्यार

भारतभूमी पुण्यभूमि ही मातृभूमि मम प्यार
नम्र होउनी स्वार्थ सोडुनी सेवा मी करणार ।। ध्रु० ।।

झाली झाली स्वतंत्र झाली पांग अतां फिटणार
गुलामगिरिचे पाश तोडुनी जगता उद्धरणार ।।

तव स्मरण जननी । अम्हां देत स्फूर्ती
तूंच एक जगतीं । आशेची मूर्ती
भारतमाते ! पददलितांतें
मार्ग अतां दिसणार । सेवा मी करणार ।। १ ।।

माझी माता भाग्यशाली आम्ही तीस कोटि पुत्र
श्रमुनि वैभवा देऊं तिजला अखंड हें सत्र ।।

धन्य बंधु अमुचे । प्राणपणें लढले
मुक्त केली आई । स्वातंत्र्यें नटले
धरणीमाते ! अशांतींतुनी
शांति जगा मिळणार । सेवा मी करणार ।। २ ।।

☆ ☆ ☆

## २४. माझी शाळा

माझी शाळा कल्पतरू
कोणी येवो वाटसरू ।

हिच्या सावलिंत श्रान्तांना
मिळे गारवा सर्वांना ।

हिच्या फुलांचा मधु गंध
करितो बालांना धुंद ।

अमृतभरलीं मधुर फळें
जीवन रसरसतें सगळें ॥ १ ॥

माझी शाळा स्वर्ग जणूं
विद्यार्थी आम्ही सर्व म्हणूं ।

आनंदाचें मुक्तद्वार
येथें वृत्ती होइ उदार ।

सेवावी विद्यादेवी
पूजा असते नित्य नवी ।

खेळांना नाहीं तोटा
शक्तीचा मिळतो सांठा ॥ २ ॥

माझी शाळा गुरुकुल हें
मातेसम धरि छत्र स्वयें ।

शारदाश्रमीं स्वीकारा
सेवकवृत्ति सदाचारा ।

नागरिकांच्या कर्तव्या
पाळुनि करुं पृथ्वी धन्या ।

एकमेकां साह्य करूं
सुपंथासि अवघेचि धरूं ॥ ३ ॥

☆ ☆ ☆

## २५. क्रीडामहोत्सव

—पर्वणी
आजि पातली
सुखद जाहली
खेळ किति छान, खेळ किति छान
ना उरे कुणाला भान —रे चला ॥ १ ॥

—सौंगडी
उभे ठाकले
डाव मांडिले
खेळुं भरपूर, खेळुं भरपूर
सौख्यानें भरलें ऊर —रे चला ॥ २ ॥

—पंचहो
धर्म झालांत
धन्य केलेंत
घेउं शपथेला, घेउं शपथेला
मानुंया सत्य-नियमांला —रे चला ॥ ३ ॥

☆ ☆ ☆

## २६. गुरुजींनीं केलेली मृत्यूची आळवणी

सख्या, रे ! दाखवी मंगलधाम
सुखशांतीचें स्थान ॥ ध्रु० ॥

जेथ अबाधित नांदे समता
विकास सकलां सहजी, श्रमतां
जीवनीं बहरे खरी बंधुता
एकच आशास्थान ॥ १ ॥

भारतीं जन्मुनी धन्य जहालों
यज्ञ कराया गर्भीं शिकलों
आत्मोद्धरणीं सज्ज जहालों
घेऊनि सतीचें वाण ॥ २ ॥

जाणिव येतां नेत्र उघडिले
काळोखांतहि लख्खच दिसलें
परदास्यानें बांधव खचले
होउनि ते निष्प्राण ॥ ३ ॥

हांक ऐकतां उडी घेतली
स्वातंत्र्यास्तव आहुति दिधली
सर्वस्वाची करुनी होळी
घेइ जिवाची आण ॥ ४ ॥

स्वराज्य झालें भारतीं अतां
आनंदली ही सारी जनता
स्वप्नें पाही सुखी, रंगतां
कशास आतां वाण ॥ ५ ॥

हाय ! परंतू भंगुनि गेलीं
स्वप्नें सारीं हवेंत विरलीं
गांधीजींची शिकवण नुरली
केवळ घेती नाम ॥ ६ ॥

रामराज्य तें दूर राहिलें
तत्त्वापासुनि भ्रष्ट जहालें
खंत वाटुनी सज्जन विटले
मार्ग कोणता सांग ॥ ७ ॥

सेवादल दे आशा, फुललों
भारत अवघा वणवण फिरलों
समाजवादा आणूं श्रमलों
आन्तरभारती जाण ॥ ८ ॥

बालां रिझवूं कथा सांगुनी
सुंदर पत्रें सुधा धाडुनी
लोकशाहिचें गान करोनी
करिन साधना दान ॥ ९ ॥

मृत्यो ! तूं मज सखा भाससी
चिरवांछित तें आजि दाविसी
एकच आतां ध्यास जिवासी
त्यजिले बंध महान् ॥ १० ॥

( पू. काका कालेलकरांनीं केलेली पूर्ती )
[ मृत्यूच्या घरीं ] येथें नाहीं झाली कोणाची निरास ।
आल्या याचकास कृपेविशी ॥

☆ ☆ ☆

## २७. भूदान संक्रमण

( चाल–हे घनःश्याम श्रीराम )

भूदान असे सोपान खरोखर छान ॥ ध्रु० ॥

स्वातंत्र्य सार्थ करुं या ध्येयानें
गणराज्य सत्य स्थापूं या श्रद्धेनें
मग आदिवासी भूहीन हरीजन करतिल वरतीं मान ॥ १ ॥

दलितांसि उद्धरूंया भूदानें
संपन्न देश करुंया त्यागानें
मग उपाशी जनता भाकरी खाउनि प्रेमें गाइल गान ॥ २ ॥

भूवरी खपुनि पिकविती अन्नासी
गाळुनी घाम निर्मिती लक्ष्मीसी
झणिं अन्यायानें त्यांना पिळणें सोडुनि वाहूं आण ॥ ३ ॥

बंधुंना जमिन वाटूंया देवाची
संपत्ति तशी सकलही जनतेची
हवि यज्ञामाधिं या अर्पुनि होइल अघमर्षण हें जाण ॥ ४ ॥

संक्रमणकाळ आजि व्हा सामोरे
तिळगूळ गोड करितसे मनुजां रे
नच रक्तानें जी व्हाते क्रान्ती चिरसुखदायी जाण ॥ ५ ॥

☆ ☆ ☆

## २८. बालदिन–गीत

गड्यांनो ! खेळुंया भरपूर, वाहवूं अमृताचा पूर
नंदाच्या घरचे गोविंद, आम्हांला खेळ हा छंद ।

लगोऱ्या हुतुतु लंगडी, उड्या अन् नाच हरघडी
रंगुंया नाचगाण्यांत, जगाची मौज लुटण्यांत ।

गोप अन् गोपी व्हा कोणी, मंथुनी हरिसी द्या लोणी
धरुनिया फेर स्नेहाचा, गोफ तो बनवूं प्रेमाचा ।

गुंगुंया मुरलीनादानें, हरीच्या प्रेमदानानें
जगाला हंसवूं हास्यानें, फुलवुंया देश प्रेमानें ।।

☆ ☆ ☆

## २९. लोकमान्यांना वंदन

( चाल—हें तव विफल जल सागरा )

या शुभदिनीं करुंया वंदना
टिळकां, जनका ह्या नमूं अशांततेच्या
प्रेमें बलवंतांना ।। ध्रु० ।।

सत्तावनच्या क्रांति उषेला अरुण उदेला सूर्यप्रभेनें
रत्नागिरिच्या रत्नागारीं खुलवी टिळक कुलांना ।। १ ।।

गंगाधरसुत बाळ टिळक हें रत्न चमकलें बुद्धिवैभवें
पुण्यपत्तनीं राष्ट्रोद्धारक देई शिक्षणदाना ।। २ ।।

महाराष्ट्र—केसरी गर्जना उठवी निद्रित भारत अवघा
तेलीतांबोळी नेता बनला, दहशत परकीयांना ।। ३ ।।

'स्वराज्य माझा जन्मसिद्ध हा हक्क असे तो मिळवीनच मी'
देउनि ऐसा मंत्र अलौकिक उद्धरी जो दीनांना ।। ४ ।।

रहस्यअमृत भगवंतांच्या गीतार्णवीचें काढुनि देई
कर्मयोग जीवनीं आचरुनी सुखवी जो सकलांना ।। ५ ।।

लोकमान्य ही पदवी अर्पुनी जनता स्थापी हृदयमंदिरीं
ऐसा आम्हां पिता शोभला स्वतंत्र भारतीयांना ।। ६ ।।

☆ ☆ ☆

# ३०. वीरांस देउंया मान

वीरांस देउंया मान, नको अनमान ।। ध्रु० ।।

स्वातंत्र्यसमरिं झुंजले ईर्ष्येनें
धर्मार्थ प्राण अर्पिले निष्ठेनें
त्या वीरजनांना वीरयुवतींना स्मरुनि देउं उत्थान ।। १ ।।

स्वार्थासि दूर लोटिलें ध्येयानें
देशार्थ बंधु जमविले प्रेमानें
त्या नरवीरांना त्यागि भगिनिंना सदाच पहिलें स्थान ।। २ ।।

झांशिची लक्ष्मी रणचंडी जन-राणी
हिंदिवीर तात्या टोपे सेनानी
तो बहादुरशहा नानासाहेब यांचा करुं सन्मान ।। ३ ।।

काल्पीला केला कहर शूरांनीं
कानपूर दिल्ली गाजे तोफांनीं
हिंदू-मुस्लिम फिरंगियांना घालिति कंठस्नान ।। ४ ।।

जाणीव जाळि जनतेला बेड्यांची
सैनिक आण वाहती देवाची
ती वीरगर्जना भिववी अरिला, उठला हिंदुस्थान ।। ५ ।।

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ३०९२३ वि: काव्य
क्रमांक ७५७२८ नों. दि: २।५।६९

# ३१. सुनीतांजलि

अहा! चंदनाचेपरी दिव्यगंध भरोनी उरे शारदामंदिरीं
पुजारी जगावेगळा घाशितो हा तनू चंदनीकाष्ठ हें मानुनी
शिवाचीच पूजा अखंडीत चाले तया वाहतो बिल्व सेवेंतुनी
घुमे आसमंतांत विद्यार्जनाचा गभीरार्थ हा मंत्र पृथ्वीवरी.

यशोगीत गावें तुझ्या जीवनाचें अशी आस ही एक अभ्यंतरीं
तपस्वी खरा तूं मनाचा विरागी, स्तुती नावडे, मुग्ध होतों जनीं
परीं आजि कल्लोळ हे भावनांचे उदेले मनाच्या सतारींतुनी
क्षमा याचितों, द्या अनुज्ञा क्षणाची, उगा छेडितों आपुल्या अंतरीं ।

महाराष्ट्र मोहोळ कर्या जनांचें गुरूमंत्र देतोसि सेवाव्रता
क्षमाशीलता पृथ्विला, अंतरिक्षा मनःशांति अर्पी तुझी गूढता
सुदामा तसे कृष्ण विद्यार्थि येती तुम्ही जाहलां थोर सांदीपनी
कृपासिंधु विस्तीर्ण गंभीर शांत पिता हा जणूं योजि जो कारणीं.

महात्मा खुले भव्य अद्री हिमाचा, द्रवे, होइ माता, झटे रक्षणीं
चिरंजीव तुम्ही खरे कर्मयोगी सुधा बालकां देतसा जीवनीं ।।

☆ ☆ ☆

# ३२. गानसमाधी

( चाल- अवखळ पोरिसमान )

अवभृथ स्नान अहा
चाखिला मकरंद ॥ ध्रु० ॥

काव्यामृत संगीत करी मनासी धुंद
हा असाच अनुदिन चाखावा स्वच्छंद
श्रीज्ञानदेव जणूं चाखित ब्रह्मानंद ॥ १ ॥

स्वर्गीची कोकिळा धरेवरी अवतरे
मधू कंठरवानें भुलवित नित जीवा ये
ही गवसलीच मज निर्झरिणी गंगोत्री ॥ २ ॥

कीं वेदमंत्र मज नेतां प्रभुचरणांसी
उद्‌घोष घुमे अन्‌ छेडी हृद्‌-तारांसी
नी समाधी लागे विश्वाच्या गाभारीं ॥ ३ ॥

☆ ☆ ☆

## ३३. सुवर्णकालीं

( भूपाळी )

नयन उघडि ब्रह्मरूप
या सुवर्णकालीं ।। ध्रु० ।।

विश्वाचें रूप लीन
आविरत करी भजनगान
पीतवसन नवजीवन
होई लोक-अभिराम । नयन उघडि ब्रह्मरूप
मनविहंगधाम । नयन उघडि ब्रह्मरूप ।
या सुवर्णकालीं ।। १ ।।

क्षणभर तत् साहि नयन
लीनभाव कविलोचन
यज्ञेश प्रभुदर्शन
रणकर्कश यमतर्जन । नयन उघडि ब्रह्मरूप
भरताग्रज सुखअर्जन । नयन उघडि ब्रह्मरूप ।
या सुवर्णकालीं ।। २ ।।

दाशरथी रामचंद्र
गुणनिधि मम रामभद्र
करुणाकर हाचि चंद्र
सोन्याचा शुभद कलश । नयन उघडि ब्रह्मरूप
सौम्यरूप शांतमूर्ति । नयन उघडि ब्रह्मरूप ।
या सुवर्णकालीं ।। ३ ।।

दुर्वादल श्यामल हरि
कांचनमृग घेइ उरीं
सीतापति रावणारि
सत्यसंध रमा–ईश नयन उघडि ब्रह्मरूप
विश्वरूप क्रांतदर्शी । नयन उघडि ब्रह्मरूप ।
या सुवर्णकाळीं ॥ ४ ॥

रामचंद्र मनमोहन
श्रवणिं नयनीं एक राम
विश्वाचें सुभगध्यान
पद्माक्षें भावपूर्ति । नयन उघडि ब्रह्मरूप
गाति सकल देवर्षी । नयन उघडि ब्रह्मरूप ।
या सुवर्णकाळीं ॥ ५ ॥

☆ ☆ ☆

# ३४. गरुडापरि

गरुडापरि मी गगनीं विहरिन
त्रिखंड धुंडित अखंड हिंडिन ।
ध्यास एक हा मम जीवासी
पर्वा कसली जरि वनवासी ।।

कपोत पोपट बुलबुल् मैना
दीन मनाची करिती दैना ।
घुमवित हृदिंची व्यथा कूजिती
अहंभाव खुलवुनी पूजिती ।।

नकोत मजला खुजीं दैवतें
दिव्यभव्य उत्तुंग मनिं वसे ।
सह्य हिमालय कडेकपारीं
झेंप तेथुनी निळ्या अंबरीं ।।

चंड रवीच्या कक्षीं जाउनि
तेज सुवर्णी नेत्रीं घेउनि ।
कवळिन सागर नेत्रसंपुटीं
उजळिन अवनी जरी हिंपुटी ।।

गरुडापरि मम पृष्ठीं वाहिन
त्रैलोक्याचा भारहि साहिन ।
श्रीविष्णूची करुणामूर्ति
करविन गजेन्द्रमानसपूर्ति ।।

☆ ☆ ☆

## ३५. योजनगंध गांधीजी

( वृत्त–वैनायक )

गांधीजी हाच हिमालय मला गमे,
पूज्य विनोबांचें हें वचन सत्य कीं ।

गिरिकुहरीं तपसाधन वेड सोडुनी
साबरमतिआश्रमींच मग्न जाहले ।

व्याकुळलें मन, शिवबा, आर्तओढ ही
दादांच्या पाउलींच ठेउं पाउलें ।

गांधींचें दर्शनसुखलाभ हा तरी
आहे का लिहिलेला भाळि आपुल्या ।

वेडा तूं, बाळकृष्ण, कोण कोठला
अज्ञ दीन पोरा, तव काय साधना ।

धिक्कारुनि बोल असे मन मला वदे
जाउं कुठें, काय करूं, कांहिं ना कळे ।

निर्धार मनीं करुनि तदा पत्र धाडिलें
बापूंचें उत्तर किति त्वरित पावलें ।

संवेदनक्षम उदार थोर महात्मा
कोणीहि पत्र लिहो उत्तरीतसे ।

बालांच्या तरुणांच्या स्वप्निं रंगती
बापूजी म्हणुनि सदा जिंकिती मनें ।

या तुम्ही भेटण्यास स्टेशनावरी
शब्द नव्हे अमृतची त्यांस भासलें ।

बापूंचें दर्शनसुख क्षणहि लाभतां
बाळकृष्ण शिवबा नत भक्त जाहले ।

वाहूंया आपुलींहि जीवनें पदीं
जाऊंया साबरमतिआश्रमीं झणीं ।

बापूंच्या हातिं पडे पत्र दूसरें
मातेच्या सेवेस्तव तरुण अम्हि खडे ।

आश्रमीय जीवनांत स्थान द्या अम्हां
नाहिं दुजी आकांक्षा अन्य आसही ।

हर्षभरें बापूंनीं उत्तरा दिलें
धन्य तुम्ही बंधु तिघे मातृभक्त जे ।

झाला मम प्रथम पुत्र धन्य विनोबा
द्वितिय बाळकोबा, तूं तृतिय शिवाजी ।।

☆ ☆ ☆

## ३६. श्रीमहाराष्ट्र अमुचा नव्या नवलाचा

श्रीमहाराष्ट्र अमुचा नव्या नवलाचा ॥ ध्रु० ॥

स्वातंत्र्यास्तव यज्ञ मांडुनी । प्राणांची आहुती अर्पुनी
अज्ञदीन दलितांना सुखवी । अमृत वाणीचा ॥ १ ॥

सह्याद्रीच्या कडेपठारीं । फुलवित डुलवित मावळखोरीं
भीमागोदा कृष्णामाई । तापिकोयनेचा ॥ २ ॥

परशुराम शिवखंडेराया । भवानिमाता सांभाळाया ।
हरिनामाचा गजर विठूचा । गर्जे भक्तांचा ॥ ३ ॥

ज्ञानदेव तुकया चोखोबा । रामदास नामा गोरोबा ।
एकनाथ जो नाथ अनाथा । संतशिरोमणिचा ॥ ४ ॥

सत्याश्रय पुलकेशि पुरातन । शककर्ता तो शालिवाहन ।
छत्रपती शिवबा संभाजी । ऐशा राजांचा ॥ ५ ॥

सिंधुदुग गड सिंहपराक्रमी । शनिवारवाडा किल्ला वसई ।
शिंदे पेशवे होळकर गाजी । मर्द मराठ्यांचा ॥ ६ ॥

सेनापति संताजि धनाजी । तात्या टोपे शूर सवाई ।
अखंड झुंजत परसत्तेशीं । गनिमीकाव्याचा ॥ ७ ॥

माय जिजाई देवि अहिल्या । स्फूर्ति देति ज्या सति मांगल्या ।
वीरोचित वर्षति वात्सल्या । राणी लक्ष्मीचा ॥ ८ ॥

न्यायमूर्ति गुरु, भारतसेवक । पाटिल कर्वे समाजसेवक ।
भीम ज्योतिबा आगरकर नव–समाजद्रष्ट्यांचा ।। ९ ।।

सेनापति बापट पटवर्धन । अंत्यजदलितांचें उद्धारण
आंतरभारति ध्येय सनातन । सानेगुरुजींचा ।। १० ।।

क्रांतिवीर फडके सावरकर । लोकमान्य ते टिळक वीरवर
स्वराज्य माझा हक्क असे चिर । सिंहगर्जनेचा ।। ११ ।।

चिनी असो वा पाकिस्तानी । संकट दिसतां अमुच्या भुवनीं
खड्ग उसळतें म्यानांतूनी । काळ दुष्मनांचा ।। १२ ।।

देशरक्षणा धांवुनि जाणें । तळहातावर शिरासि घेणें
स्वत्व राखण्या प्राण वेंचणें । अशा मराठ्यांचा ।। १३ ।।

ब्रीद न अमुचें कधीं ढळेल । सह्य न अमुचा कधीं चळेल
हिमालयाला आश्वासील । अद्रि निर्भयाचा ।। १४ ।।

जगताच्या उद्धारासाठीं । महाराष्ट्र घे अवतारासी
ज्ञानवीर्यकरुणेच्या पोटीं । ऋषी विनोबांचा ।। १५ ।।

☆ ☆ ☆

## ३७. माझं जीवनस्वप्न

स्वप्न रेखिलें सुंदर मंगल ।
तेजोनिधिनें झालें उज्ज्वल ।।

कृष्णनील आकाश–सागरीं
चंद्रनाव डुलतसे साजिरी
फेनधवल घन नाचति लाटा
खट्याळ वायुहि धांवे उलटा
नावाडी ग्रहगोल अंबरीं
हाकारिति ते नाव बंदरीं
झरझर झरझर नाव चालली
माणिकमोतें किती विखुरलीं
मोह तयांचा क्षणीं वितळला
प्रभु शिवशक्ती देई मजला ।।

उतरुनि आलों अवनीवरती
फुललों नवचैतन्यासंगतिं
कंबर कसुनी कार्यीं रमलों
कितीहि श्रमलों तरी न दमलों
आपसांतले भेद मिटविले
विसरुनी जातिभेदहि सगळे
मनें मिळवुनी कलंक धुतले
दीन दलित खेडुत उद्धरले ।।

कोण कोठला कशास पुसतां
हिंदभूमिच्या कुशींत असतां
हिंदू यवनी ख्रिस्ति पारशी
जैन बुद्ध कीं शीख इसाई
ज्यूंनो अँग्लो-इंडियनांनो
कुणी असा तुम्हि अनामिकांनो
यारे यारे बंधू सगळे
खांद्या खांदा भिडवूं स्वबळें
भगिनीमाता घेऊं संगें
उज्ज्वल उन्नत गांठूं ध्येयें ।।

सुजला सुफला माता अपुली
सहस्रावधी वरुषें झिजली
तरीहि फुलुनी अपणां जगवी
घाम गाळुनी देउं टवटवी ।।

लतावृक्ष फुलबाग बहरली
मधुररसानें सुफळें भरलीं
धान्यधनानें शोभे धरणी
समृद्धी बघूं डोळे भरुनी
सुखशांतीनें नांदूं भारतीं
बंधू अपुले साऱ्या जगतीं
दृष्टि तयांना अपुली देऊं
जीवनतत्त्वा दिव्य समर्पूं
सार्थ करूंया मानवजीवन
हेंच असे मम जीवनस्वप्न ।।

☆ ☆ ☆

# स्वररचनेबद्दल दोन शब्द

प्रस्तुत पुस्तकांतील कांहीं कवितांना चाली देऊन त्यांचें नोटेशनहि करून देण्याबद्दल माझे स्नेही श्री. न. दि. दुगल यांनीं मला विनंती केली. त्यांचा व माझा स्नेहसंबंध लक्षांत घेऊन मीं तें काम पत्करलें व कामास लागलों. या पुस्तकांत शेवटीं सहा पद्यें नोटेशनसह छापलीं आहेत. त्यावरून तीं पद्यें म्हणण्यास सोईचें जाईल असा विश्वास आहे. चाली देतांना जेवढ्या सोप्या देतां येतील तेवढ्या देण्याचा प्रयत्न केला आहे. स्वररचनेच्या बाबतचें माझें हें पाहिलेंच पाऊल असल्यानें चाली कितपत चांगल्या वठल्या आहेत तें रसिकांनीं अभिप्राय व्यक्त केल्यानंतरच ठरणार आहे. माझे स्नेही श्री. दुगल यांनीं स्वररचनेच्या कामाची मला संधि दिल्याबद्दल खरोखरीच मी त्यांचा आभारी आहें. तसे आभार मी मानणें कदाचित् त्यांना बरें वाटणार नाहीं याचीहि जाणीव मला आहे. परंतु मला त्याबद्दलचा उल्लेख केल्याशिवाय राहणें बरें वाटत नाहीं, म्हणून लिहिलें आहे.

या पुस्तकांत जी पद्यांची स्वररचना दिली आहे त्यांचे बाबत व तालाबाबतहि खुलासा पुढें दिला आहे. त्यावरून पद्यांच्या चाली गाण्यास सुलभ जाईल असा विश्वास वाटतो.

विष्णु रामचंद्र परांजपे

## तालाबद्दलची माहिती :

+ ही खूण समेची आहे.

० ही खूण कालाची आहे.

(१) संचलन-गीताचें ठेक्याचे (Marching rhythm) मात्रा ८ व बोल पुढीलप्रमाणें—

**धातिट् धातिट् धातिट् धातिट् धातिट् धातिट् धाधा धा.**

(२) कवाली ताल मात्रा ४ बोल

**धातिं ताता तातिं धाधा.**

(३) केरवा ताल मात्रा ४ बोल

**धागि नतीं नक् धिन् .**

## स्वराबद्दल माहिती :

(१) मध्यसप्तकांतील स्वर खुणेशिवाय तसेच लिहिले आहेत.

जसें– **सा, ग ....**

(२) मंद्र सप्तकांतील स्वरांच्या खालीं टिंब दिलें आहे.

जसें– **नि़**

(३) तार सप्तकांतील स्वरांच्या माथ्यावर उभी रेघ दिली आहे.

जसें– **सां गं**

(४) कोमल स्वराचा पाय मोडलेला आहे.

जसें– ग्

(५) तीव्र मध्यम – म् असा लिहिला आहे.

पहाडी व मिश्र पिलू या रागांत जी पद्यरचना केली आहे ती गातांना मध्यम स्वर षड्ज समजून रचना गावी.

✡ ✡

# कांहीं पद्यांचीं नोटेशनें

## तेनसिंग

राग–शंकरा;            ताल–संचलन गीताचा

| १ | २ | ३ | ४ | |
|---|---|---|---|---|
| + | | ० | | |
| सासा | गग | प | पप | |
| शृंग | जिंकि | लें | अम्हीं | |
| निनि | पप | निऽ | रे॑सा॑ | |
| एव्हरेस्ट | | बाऽ | पुडें | |
| सा॑सा॑ | गं॑प॑ | गं॑रे॑ | सा॑ | |
| तेन | सिंग | संग | ती | |
| सा॑प | पप | निऽ | रे॑सा॑ | |
| अम्ही | चाल | लोंऽ | पुढें | ॥ ध्रु० ॥ |
| सासा | गप | गरे | सा, प | |
| द्वंद्व | आज | संप | ले, नि | |
| नीनी | धप | पध | सा॑नि | |
| सर्ग | देव | नम | विलें | |
| सा॑सा॑सा॑ | गं॑प॑ | गं॑रे॑ | सा॑, नि | |
| असाध्य | तेंहि | साधि | लें; दु | |
| निप | पप | निसा॑ | रे॑सा॑ | |
| र्लंध्य | लंघि | लेऽ | कडे | ॥ १ ॥ |

## "श्री महाराष्ट्र अमुचा नव्या नवलाचा"

राग–सारंग; ताल–केरवा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | |
| + | | ० | सा | |
| | | | श्री | |
| रे | म | पनि् | पम | |
| म | हा | राष्ट्र | अमु | |
| रे | सा | नि़सा | रेसा | |
| चा | ऽन | व्याऽ | नव | |
| रे | सा | | | |
| ला | चा | | | ॥ ध्रु० ॥ |
| रे | म | प | पप | |
| स्वा | तं | त्र्या | स्तव | |
| नि् | पम | रे | रेसा | |
| य | ज्ञऽ | मां | डुनि | |
| रेम | रेम | प | मप | |
| प्राऽ | णांऽ | ची | आऽ | |
| नि् | पम | रेरे | सा | |
| हु | तीऽ | अर्पु | नी | |
| म | मप | प | मप | |
| अ | ज्ञही | न | दलि | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मप<u>नी</u> | पमप | र॑रे | सा | |
| तांऽ | ना | सुख | वी | |
| रे | मम | प<u>नी</u> | पम | |
| अ | मृत | वाऽ | णीऽ | |
| परे | सा | निसा | रेसा | |
| चाऽ, | न | व्याऽ | नव | |
| रे | सा | | | |
| ला | चाऽ | | | ॥ १ ॥ |

* * *

## मंदारमाला

राग–पहाडी ताल–कवाली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| + | | ० | |
| धृ | सासा | सारेगरे | ग |
| मंऽ | दार | माऽऽऽ | ला |
| गम | रेसा | रे | रे |
| सुर | वर | मा | ला |
| म् | पग | सा | रे |
| अ | र्पि,रु | क्मि | णी |

| | | | |
|---|---|---|---|
| गप | गरे | सा | सागरेसा |
| श्रीऽ | कृऽ | ष्णा | लाऽऽऽ |
| निसा | रेसा | नि | सासा |
| साऽ | गर | मं | थुनि |
| सा | ग | म् | पप |
| सुरा | ऽ | सु | रानी |
| मप | ग | मप | ग |
| धरा | न | टवि | ली |
| निसा | रेम् | गऽ | रेसा |
| नव | रऽ | त्नांऽ | नीं |
| मप | धप | ध | ध |
| प्राऽ | जऽ | क्ता | च्या |
| ग | पप | पधनिध | ध |
| दि | व्य फु | लाऽऽऽ | नीं |
| पध | पध | मप | ग |
| वसु | धेऽ | वर | ती |
| सा | रेम् | गरे | सागरेसा |
| स्व | र्ग,व | सवि | लाऽऽऽ |

* * *

## भूमिकन्या

राग–मिश्रपिलू ताल–कवाली

| १ | २ | ३ | ४ |
| --- | --- | --- | --- |
| पग् | रेग् | रे | सा |
| भूमि | कन्या | आ | म्हीं |
| पग्रे | ग् | रे | सा |
| समद्याऽ | मि | ळो | नी |
| सासा | सासा | सा | सा |
| साद | घालुं | सी | ता |
| ऩिसारेग् | रे | ग् | रे |
| माऽऽऽ | ई | ला | ऽ |
| धऩि् | धऩि् | सा | साऽ |
| त्रिगि | त्रिगि | च | लाऽ |
| सा | पप | म | गम |
| झा | लीद्या | आ | पुली |
| ग्रे | ग्रे | साऩि | सा |
| सव् | तंत्र | माऽ | ता |
| सा प | ऽप | म | गम |
| उभी | ऽक | रा | ऽया |
| रे | ग्रे | साऩि | सा |
| द्वे | ऊंया | ह्राऽ | ता |

| | | | |
|---|---|---|---|
| साप | पप | मग | ऽम |
| मुखिं | तिच्या | घालूं | या |
| रे | ग़्रे | सानि़ | सा |
| सु | ग्रास | घाऽ | सा |
| नि़सा | सासा | साऽ | साऽ |
| पाहुं | तिच्या | गोड | गोड |
| नि़सा | रे,सारे | ग् | रे |
| रुऽ | पाऽऽ | लाऽ | ऽ |

* * *

## गुरुजींनीं केलेली मृत्यूची आळवणी

राग–मिश्रमांड ताल–कवाली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| + | | ० | |
| | सा | सागमध | पम् |
| | स | ख्याऽऽऽ | रेऽ |
| मध | मप | गऽ | सासा |
| दाऽ | खवि | मंऽ | गल |
| सा | ऽसा | सागमध | पम |
| घाऽ | म,स | ख्याऽऽऽ | रे |

| | | | |
|---|---|---|---|
| मम | मऽ | प | पधनी |
| सुख | शांऽ | ती | चेऽऽ |
| पध | पम;ध | पधमप | गमरेग |
| स्थाऽ | न,स | ख्याऽऽऽ | रेऽऽऽ |
| म | मम | प | पप |
| जे | थअ | बा | धित |
| पध | निसांनि | ध | धप |
| नांऽ | देऽऽ | सम | ता |
| पग | म | पप | प |
| विका | स | सक | ला |
| पध | निसांनि | धध | प |
| सह | जीऽ | श्रम | तां |
| सां | सांसां | सांसां | सां |
| जी | वनिं | बह | रे |
| सां | निध | पधसां | नि |
| ख | रीऽ | बंऽधु | ता |
| पधनि | पध | पम | गम |
| एऽ | कच | आऽ | शांऽ |

पऽ प

स्था न —सख्यारे दाखवि... म्हणावें.

मराठी ... संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ११६८९

* * *

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

## नेताजी

राग–मिश्रपिलू ताल–कवाली

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| + | | ० | |
| ग् | ग् | ग् | ग् |
| ने | ताऽ | जी | करि |
| मऽ | पग् | रे | सा |
| शांऽ | त,चं | द्रि | का |
| ग् | रेग् | ग्रे | रेसानि़ |
| प्रा | ण,प | दी | अऽऽ |
| सारे | रे | म | प |
| पुंनी | हिं | द | वी |
| रे | ग्रे | नि़सा | रेग |
| ग | डी,य | शा | चाऽ |
| रेसा | ऽ | | |
| धनी | ऽ | | |
| रेप | मप | ग्रे | सा |
| भाऽ | रत | भूऽ | च्या |
| रेऽ | म | प | प |
| पुऽ | ण्या | ई | नें |
| प | पप | रे | मम |
| बं | ग,दे | श | फुल |

| | | | |
|---|---|---|---|
| प | म | ध | प |
| लाऽ | ऽज | न्म | दे |
| रेग् | ऽरे | नि़सा | रेग् |
| सुभा | ऽष | चंऽ | द्राऽ |
| रेसा | | | |
| लाऽ | | | |

" भारतभूच्या "–या ओळीप्रमाणेंच, " महाराष्ट्रानें " ही ओळ घ्यावी.

| | | | |
|---|---|---|---|
| | | | धप |
| | | | गुण |
| गप | म | रेग | सा |
| सुम | नें | जम | लीं |
| सारेगरे | रेगप | प | पध |
| साऽऽ | ऽ | री | बाऽ |
| गप | म | रेग् | सा |
| ळाऽ | ला | माऽ | ला |
| सा | सा | ऽ | नि् |
| घाऽ | ली | ऽ | बु |
| नी | नी | ध | पम |
| द्धी | चे | ते | ज,त |
| प | प | ऽ | रेमपध |
| यां | चे | ऽऽ | पाऽऽऽ |
| मप | ग् | सारे | नि् |
| होऽ | नी | जन | ता |

| | | | |
|---|---|---|---|
| सासा | ऽऽ | ऽ | ऩि |
| दिप | ली | ऽ | मा |
| ऩि | नि | धप | म |
| ते | सि | अर्पि | लें |
| प | प | ऽ | रेमपध |
| सा | रे | ऽ | त्याऽ |
| मप | ग् | सारे | ऩि |
| गाऽ | ने | विस्मि | त |
| साऽ | सा | | |
| झा | ली | | |
| ग् | ग् | ग् | ग् |
| गां | धी | जीं | चा |
| ग् | मप | ग्रे | सा |
| शि | ष्योऽ | त्तम | हा |
| रे | ग्रे | ऩिसा | रेग् |
| अ | जोड | विऽ | क्रांऽ |
| रे | ऽ | रेऽम | पम |
| त | ऽ | घाऽलि | तो |
| रे | ग्रे | ऩिऩिसा | रेग् |
| ड | डीऽ | संऽक | राऽ |
| रेसा | | | |
| तऽ | | | |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
क्र. ३०८२३ वि: ७४७
नों. दि: २९।२।१४

REFBK-0011989
REFBK-0011989